साहित्य प्रेमी वार्ता
जून २०१० अंक २० वा

✲ संपादिका ✲
डॉ.मंदा खांडगे
✲ संपादक मंडळ ✲
डॉ. ज्योत्स्ना आफळे, मीरा शिंदे,
प्रा. रंजना फडके,शलाका माटे

✲ पत्रव्यवहाराचा पत्ता ✲
मीरा शिंदे
कार्यवाह
शाकुंतल, ज्ञानेश्वर पादुका चौक,
फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणे-४.
दूरध्वनी : ०२०- २५६६२६०६

आई तुझी माया जसा
पारीजातकाचा सडा,
ओढ्याकाठी कंटकांत
फुले सुगंधी केवडा, ।।१।।
देवळात जावयाची
आम्ही नव्हतीच घाई,
देव घरीच थांबले
अशी आमची पुण्याई ।।२।।
हात डोळ्यांशी ठेवू
किती पाहू दारावर
आता नाही दिसायचा
असा मायेचा पाझर ।।३।।
गंगा मिळाली गंगेला
आता उरे आठवण
वाटे श्रावणाचे परि
न्यावी कावड पाहून ।।४।।
वि.म.कुलकर्णी

लेखिका व साहित्यप्रेमींचे
हक्काचे व्यासपीठ

साहित्यप्रेमी भगिनी मंडळ
वर्ष ४५ वे
स्थापना :१९६५

बुक-पोस्ट

प्रति, ____________________

## मनोगत

मैत्रिणींनो नमस्कार,

विशेष कार्यक्रमांचे साहित्यप्रेमी वार्तापत्र घेऊन आपल्या भेटीस येत आहोत. साहित्यप्रेमी भगिनी मंडळाच्या संशोधन विभागाने घेतलेल्या अथक परिश्रमातून साकार झालेला भारतीय भाषातील साहित्याचा मागोवा १८५० ते २००० खंड १ व खंड २ या ग्रंथाच्या इंग्रजी आवृत्तीचे प्रकाशन आदरणीय महाश्वेतादेवी, ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या, यांच्या शुभहस्ते पार पडले. अध्यक्षस्थानी मा. आ.डॉ.पतंगराव कदम कुलपती भारती विद्यापीठ, व तौलनिक व आदिवासी साहित्याचे अभ्यासक मा.आ. गणेशदेवी यांची उपस्थिती महनीय ठरली. या प्रसंगी डॉ. धीरूबेन पटेल, गुजराथी डॉ. चित्रा मुद्‌गल, हिन्दी, मा.ज्योस्ना देवधर , मराठी , मा. प्रतिभा राय, ओडिया, मा.व्होल्गा, तेलगु, यांचा साहित्यातील योगदाना बद्दल सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाची प्रसिध्दी माध्यमाने दखर घेतली व अनेकांपर्यत ही कामगिरी जाऊन पोचली.

साहित्यप्रेमी भगिनी मंडळाच्या ४४ व्या वर्धापनदिनानिमित्त वार्षिक मेळावा आयोजित करण्यात आला. याच कार्यक्रमात वर्षभरात घेतलेल्या अनेक उपक्रमांचे पुरस्कार प्रदानप करण्यात आले. त्याचप्रमाणे वाचकगटासाठी आयोजित करण्यात आलेल्या फोटो अल्बम स्पर्धेच्या बक्षिसांचेही वितरण करण्यात आले.

मे महिन्यात घेण्यात आलेल्या मुक्त व्यासपीठ या कार्यक्रमात सभासद भगिनींचा सहभाग खूप मोठा होता. या कार्यक्रमातच रानवारा या बालविशेषअंकाच प्रकाशन करण्यात आले. रानवारा या अंकामध्ये साहित्यप्रेमी सभासदांच्या साहित्याचा सहभाग होता. सभासदासाठी आयोजित करण्यात आलेली वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. उत्साहवर्धक वातावरणात ही स्पर्धा ही स्पर्धा पार पडली. डॉ. स्वाती कर्वे व साहित्यप्रेममी भगिनी मंडळातील सहभागी असलेल्या सभासदांच्या सहयोगाने स्त्रीयांची शतपत्रे या अभिवाचनाच्या कार्यक्रमाने सांगता करण्यात आली. सारे आनंददायी क्षण मनांत साठवित एकमेकींचा निरोप घेण्यात आला अर्थात पुढील भेटीच्या आश्वासनानेच

मीरा शिन्दे

## निवेदन

✲ सुवासिनी मासिकाचे संपादक कै. अविनाश केळकर यांचे स्मरणार्थ ललित लेख स्पर्धा शब्दमर्यादा १५०० ते २००० शब्द. लेख पाठविण्याची अंतिम मुदत - १० ऑगस्ट २०१०

✲ कै.पार्वतीबाई साठे प्रकाशित ललित लेख स्पर्धा १ जानेवारी २००९ ते ३१ डिसें २००९ या कालावधीत प्रकाशित झालेला ललित लेख पाठवावा. लेख पाठविण्याची अंतिम मुदत १० ऑ.२०१०.

✲ साहित्य प्रेमीच्या खालील पुरस्कारांसाठी १ जाने २००९ ते ३१ डिसें.२००९ या कालावधीत प्रकाशित झालेली पुस्तके लेखकांनी पाठवावीत.

१) कै. सुधाताई जोशी पुरस्कार ( ललित लेख संग्रह )
२) कै. इंदिरा गोविंद पुरस्कार ( बालकथा संग्रह , बालकविता संग्रह )
३) प्रबंध एकादशी समिती पुरस्कृत पुरस्कार ( वैचारिक समीक्षा ग्रंथ )
संपर्क - लीना दामले, १०६,अ,दिनेश अपार्टमेंट, चतुश्रृंगी मंदिरासमोर पुणे-१६. फोन - १६. फोन- २५६६११९२ , ९८९०५५७२४२.

## स्वागत

साहित्यावर सुजाणपणे प्रेम करणाऱ्या लेखिकांचे व साहित्यप्रेमींचे येथे स्वागत आहे.

✲ संस्थापक विश्वस्त ✲
संजीवनी मराठे, पद्मा गोळे,
शांता किर्लोस्कर, सरिता पदकी

✲ कार्यकारी विश्वस्त ✲
ज्योत्स्ना देवधर, सुमन बेहेरे,
डॉ.लीला दीक्षित,
डॉ. कल्याणी दिवेकर

✲ अध्यक्ष ✲
डॉ. मंदा खांडगे

✲ कार्याध्यक्ष ✲
डॉ. ज्योत्स्ना आफळे

साहित्यप्रेमी कार्यकारिणी
कोषाध्यक्ष - यामिनी रानडे
सह कोषाध्यक्ष- कविता मेहेंदळे
कार्यवाह - मीरा शिंदे, प्रा. रंजना फडके
सह कार्यवाह - शलाका माटे
कार्यकारिणी सदस्य - मंजरी ताम्हनकर, कविता भालेराव, संध्या गुळवणी, लीना दामले
निमंत्रित सदस्य - कुमुद राळे, विजया चौधरी, डॉ. उज्वला गोखले

## साहित्यप्रेमी वार्ता

**डॉ. शकुंतला लाटकर पुरस्कृत कै. आनंदीबाई लिमये यांचे स्मरणार्थ लघुकथा स्पर्धेतील पारितोषिक प्राप्त भगिनी**

सौ. उषा अभ्यंकर -( प्रथम क्रमांक ) (कथा) - मिलर्ड माझं कायचुकलं
विद्या गोखले - ( द्वितीय क्रमांक ) (कथा) - अम्मा आणि माधव
तृतियक्रमांक विभागून -
१)कुमुद राळे - (कथा) लक्ष्मीपूजन २) सौ. अस्मिता देव - ( कथा) आवर्त

**साहित्यप्रेमी वार्ता - साहित्यप्रेमीच्या सभासदांना गेल्या सहामाहीत मिळालेले पुरस्कार**

✲ मीरा शिन्दे - राज्यस्तरीय अभिवाचन स्पर्धेमध्ये - कोकण महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे देवनार शाखा, मुंबई यांच्या तर्फे दोन हजाराचा प्रथम पुरस्कार व वैयक्तिक अभिवाचनाचा पुरस्कार प्राप्त.

✲ कविता मेहेंदळे - महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, यांच्या तर्फे बालसाहित्यातील लेखनाचा मानाचा विशेष पुरस्कार प्राप्त

**साहित्यप्रेमी दिवाळी अंक २०१० साठी आपले उत्तम साहित्य पाठवावे.**

अ) कविता (१० ते १२ ओळी ), कथा ( शब्दमर्यादा १२०० शब्द)ललित लेख ( शब्दमर्यादा ७५० शब्द) वैचारिक लेख ( शब्दमर्यादा ७५०शब्द)
ब) साहित्य पाठविण्याची अंतिम मुदत १ ऑगस्ट २०१०
क) निवडीचा अंतिम निर्णय संपादक मंडळाचा राहिली.
ड) दिवाळी अंकासाठी सभासदांनी जाहिरात मिळवून देण्यासाठी सहकार्य करावे. त्यासाठी २०% कमिशन दिले जाईल.
इ) पाठविलेल्या साहित्याची एक प्रत आपल्याजवळ ठेवावी. निवड न झालेले लेख ( लिखित साहित्य ) परत पाठवले जाणार नाहीत.

**: संपर्क :**
ज्योस्ना आफळे ७६/१०, सुयोग, शांतीशीला सोसायटी,
लॉ कॉलेज रोड, पुणे - ४११००४. फोन नं. - २५४२४११६

## बालसाहित्य कार्यशाळा

कै.शीला घाटपांडे स्मृती दिनानिमित्तानें बालसाहित्य कार्यशाळेचे आयोजन रविवार २१ मार्च २०१० रोजी करण्यात आले. बालसाहित्यातील नामवंत असलेले शरयू सोनावळे, मा.दत्ता टोळ, मा. राजीव तांबे यांचा सहभाग असलेली ही कार्यशाळा अनेक अर्थानं परिपूर्ण झाली. बालसाहित्यातील अनेकविध विषयांना स्पर्श करीत अभ्यासपूर्ण व सांगोपांग अशी चर्चा करण्यात आली. १९८९पासून छावा मासिकात काम करणाऱ्या शरयू सोनावळे यांनी साहित्य वाचनाचा मुलांवर होणारा संस्कार व परिणाम यावर अतिशय मार्मिक भाष्य केले. मा.दत्ता टोळ यांनी बालसाहित्य संस्थेतर्फे बालसाहित्याचे २० हजार ग्रंथाचे वितरण केले. लिहावे कसे , मुलांसाठी कथा कशा असाव्यात, त्याचा प्रचार कसा करावा याबद्दल विस्तृत विवेचन केले. गावोगावी असा महत्वाचा विचार मांडला. मा. राजीव तांबे यांनी लेखनाच्या निर्मिती विषयी बहुआयामी पध्दतीने विचार करू शकतो कां यावर अतिशय अभ्यासपूर्ण चर्चा करीत, कल्पक व अभ्यासक पध्दतीने सभासद भगिनीना सहभागी करून घेत अनेक कल्पक अशा खेळामधून अनेक विषय विशद केले. कथेचा शेवट विचार प्रक्रिया वेगवेगळया व नवनवीन शब्दांचा वापर, देहबोलीतून प्रगट होण्याची किमया, रंगरेषामधून व्यक्त होण्याची पध्दत , अशा रितीने मनापासून केलेल लेखन हे नेहमी चांगलच असते. व ते कधीच लपून राहत नाही असे मत प्रदर्शित करीत कार्यशाळेची सांगता करण्यात आली. याचवेळी बालसाहित्यातील जेष्ठ लेखिका डॉ.लीला दीक्षित यांची मुलाखत घेण्यात आली व बालसाहित्य कार्यशाळेचा समारोप झाला.

## आवाहन

साहित्यप्रेमी भगिनी मंडळातर्फे प्रकाशित झालेले स्त्री साहित्याचा मागोवा हे तीन खंड फक्त सभासद भगिनींसाठी सवलतीच्या दरात उपलब्ध आहेत.
मूळ किंमत १५००/- रू. सवलत १०००/- रू.
संपर्क ताम्हणकर फोन - २५४६८६४१

भारतीय भाषांतील स्त्री साहित्याचा मागोवा या ग्रंथाच्या दोन खंडाची एकत्रित किंमत रू. १४५४/- सवलतीत रू. ९०० मध्यें खंड मिळतील.

हिशोबाच्या सोयीसाठी वार्षिक वर्गणीचे वर्ष जानेवारी ते डिसेंबर असे ठरविले आहे. ज्यांची वर्गणी राहिली असेल त्यांनी लवकरात लवकर भरावी.
वार्षिक वर्गणी रू. १००/- आणि दशवार्षिक वर्गणी रू. ८०० आहे.
प्रवेश फी ५०/-

सभासदभगिनींनी आपली प्रकाशित पुस्तके आणि मिळालेले पुरस्कार याची नोंद मंडळाकडे आवर्जून करावी.
तुमचा वाढदिवस असेल, तुमच्याकडे शुभकार्य झाले असेल,
तर अशा शुभप्रसंगीची आठवण म्हणून
साहित्यप्रेमी भगिनी मंडळाच्या विकासासाठी
आठवणीने आर्थिक मदत द्यावी. एका चांगल्या संघटनेसाठी
आपले हे सहकार्य निश्चितच मोलाचे आहे.

बाल आनंद यात्रा या शालेय विद्यार्थ्यांसाठी घेतल्या जाणाऱ्या कार्यक्रमात ज्यांना सहभागी व्हायचे असेल त्यांनी
प्रा. रंजना फडके - (३७१०९१४४२)
कविता मेहेंदळे - (२४२१७०१७)
यांच्याशी संपर्क साधावा.

### विशेष अभिनंदन

महाराष्ट्र साहित्य परिषदेचा कै.भीमराव कुलकर्णी कार्यकर्ता पुरस्कार साहित्यप्रेमी भगिनी मंडळाच्या अध्यक्ष- डॉ.मंदा खांडगे यांना प्राप्त झाला आहे.

## कार्यक्रम पत्रिका

**बुधवार - ३० जून २०१० वेळ - सायं ५.३०**
जेष्ठ कवी व शिक्षणतज्ञ कै.ग.ह.पाटील यांच्या स्मृतीप्रित्यर्थ व्याख्यान
विषय - धगधगते काश्मीर वक्त्या - मा.सुधा गोखले

**सोमवार - १२ जुलै २०१० - सहल**
महाकवी कालिदा दिन सहल वेळ - सकाळी ७ वा.
सभासदभगिनींचा मनोरंजनात्मक कार्यक्रम .
स्थळ- महाराष्ट्र साहित्य परिषद जवळ एकत्र जमणे.
कालिदास दिन सहल -माणिकडोह-शुल्क - २५० रू.
संपर्क -प्रा. रंजना फडके - ९३७१०९१४४२,
डॉ. ज्योत्स्ना आफळे - २५४२४११६, मीरा शिंदे - २५६६२६०६

**बुधवार - २८ जुलै २०१०. वेळ सायं.- ५.३०**
जेष्ठ कवयित्री कै.पद्मा गोळे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ कार्यक्रम
कवी - संदीप खरे कविता वाचन - प्रश्नोत्तरे - संवादात्मक कार्यक्रम

**शुक्रवार - २७ ऑगस्ट २०१० वेळ सायं. - ४ वा.**
जेष्ठ कवयित्री कै.संजीवनी मराठे पुरस्कृत महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनीसाठी संजीवन काव्य पुरस्कार स्पर्धा
साहित्यप्रेमी भगिनी मंडळाच्या सभासद भगिनीसाठी कालिदास काव्या पुरस्कार स्पर्धा.
संपर्क - कुमुद राळे - २४५३६६३४ यामिनी रानडे - ९८८११४७८९४

**मंगळवार - २८ सप्टेंबर २०१० वेळ - सायं. - ५.३०**
कै. आनंदीबाई किर्लोस्कर यांच्या स्मरणार्थ पत्रकारितेवर आधारित कार्यक्रम
वक्ते - मा. अरूण खोरे

**शुक्रवार - २९ आक्टोंबर २०१०**
साहित्यप्रेमी दिवाळी अंक प्रकाशन आणि कोजागिरी कार्यक्रम
अंक प्रकाशन हस्ते - मा. भानु काळे
सभासदभगिनींचा कोजागिरी पौर्णिमेनिमित्त मनोरंजनात्मक कार्यक्रम

**बुधवार - २९ नोव्हेंबर २०१० वेळ - ५.३०वा.**
प्रबंध एकादशी समिती पुरस्कृत कार्यक्रम
वक्त्या - मा. मंगला नारळीकर
डिसेंबर मेळाव्याचे स्थळ व तारीख नंतर कळविण्यात येईल.

*सर्व कार्यक्रमांसाठी स्थळ*

**महाराष्ट्र साहित्य परिषद, टिळक रोड, पुणे - ३०**

साहित्य प्रेमी भगिनी मंडळाच्या सभासद भगिनीव वाचक गटासाठी नातीगाती लेखन स्पर्धा फोटोसहित नाती कौटुंबिक , नाती निसर्गाशी , नाती प्राणी, पशू पक्षी जीवन यांच्याशी माहिती ( ३५ ते ४० पानमर्यादा ) व त्याबरोबरच त्यासंबंधीचे फोटो अशा प्रकारे लेखन स्पर्धेसाठी पाठवावे.
संपर्क - डॉ.ज्योत्स्ना आफळे-९९२२३१९४०६ ,मीरा शिन्दे - ९९२२४६०५४० .

### सभासद भगिनींची प्रकाशित पुस्तके

* पंचवर्क - दोन नाटिका - डॉ.इंदुमती देव
* सांगू कां कानात - बालकविता संग्रह - कविता मेहेंदळे
* सहजतेने जगेन मी - कादंबरी - सावित्री जगदाळे.
* आत्मभान - सुवर्णा दिवेकर
* रेशीम नातं - उषा बढे
* सदाफुली - काव्यसंग्रह - कुसुम धर्माधिकारी
* खुंटण मिरची, - कथा संग्रह, मैत्री मोलाची - बालकथा संग्रह - डॉ.लीला दिक्षित
* धुमधमाल गोष्टी - कुमार कथा - कविता मेहेंदळे
* फूटवा - कथा संग्रह - सावित्री जगदाळे.
* मानस - कविता संग्रह - सौ.मृणालिनी पोतनीस
* तिरूमलैचा कृष्णमेघ - बालाजी दर्शन - हेमलता धारवाडकर
* होमिओपॅथी - एक समलक्षण चिकीत्सा- शकुंतला शित्रे
* श्रीकृष्ण आणि महात्मा गांधी यांच्या विचारसृष्टीचा तुलनात्मक अभ्यास यापूर्वी गुजराथीतून अनुवादीत दोन व हिंदीतून अनुवादीत एक अशी पुस्तके प्रकाशित. चक्र ते चरखा-मूळ गुजराथी मराठी अनुवाद - सुषमा शाळीग्राम
* डॉ.लीला दीक्षित यांच्या पुस्तकाचे - जळगाव आकाशवाणी केंद्रावर १४ नोव्हें. पासून बहादूर बल्लू या बालकथांचे अभिवाचन क्रमश: चालू आहे. १८ भागामध्ये

### महिलांसाठी कालिदास पुरस्कार काव्य स्पर्धा

साहित्यप्रेमी भगिनी मंडळाच्या सभासदांसाठी ही स्पर्धा दि. २७ ऑगस्ट शुक्रवार २०१० रोजी होणाऱ्या जेष्ठ कवयित्री कै.संजीवनी मराठे पुरस्कृत महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनीसाठी संजीवनी काव्य पुरस्कार कार्यक्रमातच घेतली जाईल. या स्पर्धेत अप्रकाशित व स्वरचित एका कवितेचे वाचन करावे. प्रथम पुरस्कार रू. ३००/- द्वितीय पुरस्कार २००/- दिला जाईल. संपर्क - कुमुद राळे - २४५३६६२४ विजया चौधरी - २४२५०५९

**प्रकाशक**:-मंजरी ताम्हनकर, श्रीसमर्थ अपार्टमेंट्स, ५८०, शनिवार पेठ, केसरी कार्यालयासमोर, पुणे-३०. **छपाई**:- सुप्रिम कॉपिअर्स :२४४७७३३६ (खासगी वितरणासाठी)